**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त
- सीडॅकने विकसित केलेल्या चीपचं आणि डेव्हलपमेंट बोर्डचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते उद्घाटन
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष स्वबळावर लढणार
- बीड जिल्ह्यातल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या आरोपींवर मकोका दाखल होणार

**आणि**

- यंदाच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राज्यातल्या २३ जणांना विशेष आमंत्रण

**<><><><><>**

गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात पोलीस आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाला यश मिळालं असून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची ही सर्वाधिक आकडेवारी आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही माहिती दिली. ते आज दिल्लीत अंमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरच्या परिषदेत अध्यक्ष या नात्याने बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतल्या विकसित भारताचं निर्माण करायचं असेल तर नशामुक्त भारत झाल्याखेरीज ते शक्य नाही. यासाठी केंद्र आणि राज्यांनी एका व्यासपीठावर येऊन काम करायला हवं, असं आवाहन शहा यांनी यावेळी केलं. अंमली पदार्थ

विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचं तसंच मानस - दोन या हेल्पलाईन सेवेच्या सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या विस्ताराचं उद्घाटनही अमित शहा यांच्या हस्ते झालं.

ही मोहीम येत्या २५ जानेवारीपर्यंत चालणार असून मोहिमेदरम्यान ८ हजार ६०० कोटी रुपये मूल्याच्या सुमारे एक लाख किलो अंमली पदार्थांची विल्हेवाट लावली जाणार आहे. गेल्या दहा वर्षांत सुमारे २४ लाख किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आणि ५६ हजार ८०० कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली असल्याची माहितीही शहा यांनी दिली. दरम्यान, अमित शहा उद्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून ते शनिशिंगणापूर आणि शिर्डीला भेट देणार आहेत. शिर्डीमध्ये होणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनाला ते उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

सीडॅकने विकसित केलेल्या तेजा जेएएस ६४ या चीपचं आणि नोवा डेव्हलपमेंट बोर्डचं उद्घाटन आज केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते झालं. त्यांनी आज पुण्यातल्या सी-डॅक अर्थात प्रगत संगणक विकास संस्थेच्या प्रांगणात आयोजित प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्रातल्या शास्त्रज्ञ आणि अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. सीडॅक मधील सुपर काॅम्पुटर तंत्रज्ञान विकासासाठी आणि औद्योगिक कंपन्यांना आवश्यक चीप आणि अन्य तांत्रिक उपकरणांच्या विकासाबाबत सीडॅकमध्ये सुरू असलेल्या कामकाजाचा त्यांनी आढावा घेतला.

इलेक्ट्राॅनिक कंपन्यांना आवश्यक असलेल्या इलेक्ट्राॅनिक चीपस् आणि सेमीकंडक्टर विकसित करण्यासाठी रांजणगांव इथं इलेक्ट्राॅनिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार आहे. त्यासाठी सहा हजार कोटी रूपयांची तरतूद केल्याचं

त्यांनी सांगितलं. तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीने देशात पाच प्रयोगशाळाही विकसित करण्यात येणार असून नॅशनल सुपर कॉम्पुटींग मिशन ही प्रगती पथावर असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान, पुणे नाशिक रेल्वेमार्गावर असलेली नारायणगाव इथली जीएमआरटी प्रयोगशाळा अन्य ठिकाणी हलवणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचं विद्यापीठ बनवण्याचा केंद्र सरकारचा मानस असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पुण्यात केलं.  या संस्थेला विद्यापीठाचं बळ मिळालं तर अधिकारांचंही सक्षमीकरण होण्यासाठी मदत होईल, असं त्यांनी म्हटलं.  यावेळी टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेतील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. तत्पूर्वी वैष्णव यांच्या हस्ते मुख्य ऑडिटोरियमचं उद्घाटन झालं.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष स्वबळावर लढणार असल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली. नागपुरात ते वार्ताहरांशी बोलत होते. नागपूरपासून मुंबईपर्यंत आपला पक्ष स्वबळावर लढत आहे, कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो, असं राऊत म्हणाले.

खासदार अरविंद सावंत यांनीही राऊत यांच्या म्हणण्याला दुजोरा देत स्वबळावर लढण्याची गरज व्यक्त केली. पक्षाने एकट्याने विधानसभा निवडणूक लढवली असती तर यापेक्षा जास्त आमदार निवडून आले असते असं सावंत म्हणाले.

**<><><><>**

बीड जिल्ह्यातल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या आरोपींवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध कायदा - मकोका दाखल होणार आहे, अशी माहिती जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली. त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असं त्यांनी सांगितलं. या प्रकरणाचा तपास सीआयडी, एसआयडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सुरू आहे.

**<><><><>**

बीडमधल्या संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि परभणीमधल्या सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणातल्या दोषींना फाशी द्यावी अशी मागणी वाशिममध्ये निघालेल्या मूक मोर्चामध्ये करण्यात आली. या मोर्चात वाशिमचे खासदार संजय देशमुख, संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख उपस्थित होते.

**<><><><>**

भारतीय सेना स्वदेशीकरण तसंच अत्याधुनिकीकरण यामध्ये अग्रेसर असल्याचं लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी आज सांगितलं. ७७ व्या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आयोजित दक्षिण विभागाच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात सेठ यांच्या हस्ते विविध पदकं देऊन लष्करी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसंच १५ जानेवारी रोजी होणाऱ्या लष्कर दिन सोहोळ्याची रंगीत तालीम पार पडली. या कार्यक्रमाला माजी सैनिक तसच वीर पत्नी उपस्थित होत्या.

पुण्यात १५ जानेवारी रोजी होणाऱ्या ७७ व्या लष्कर दिन सोहळ्यात नेपाळ लष्कराचा बँड पहिल्यांदाच सहभागी होणार आहे. लष्कर दिन सोहोळ्यात एकंदर ७

वाद्यवृंद सहभागी होणार आहेत. ३३जणांच्या नेपाळी वाद्यवृंदामध्ये ३ महिला संगीतकारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

या वर्षी २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली इथं कर्तव्य पथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाचा साक्षीदार होण्यासाठी देशभरातून १० हजार विशेष पाहुणे आमंत्रित करण्यात आले आहेत. या विशेष निमंत्रितांमध्ये मुंबईतल्या पाच जणांचा समावेश आहे. त्यात अँटॉप हिल इथले अतुल जाधव आणि वसई इथले वैभव नितीन पाटील यांना प्रधानमंत्री यशस्वी योजनेच्या श्रेणीत आमंत्रित केलं आहे. कलाकार निवास विभागात शिल्पगुरू आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त ब्रह्मदेव पंडित, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त अभय ब्रह्मदेव पंडित यांची निवड करण्यात आली आहे. हस्तकला श्रेणीत महाराष्ट्र टेक्सटाईल कार्पोरेशनच्या सहाय्यक आयुक्त उज्वला सदाशिवराव पाटील यांना आमंत्रित केलं आहे. महाराष्ट्रातून एकूण २३विशेष पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

प्रदुषण नियंत्रणात योग्य कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं यासंदर्भात विविध विभागांची बैठक घेतल्यानंतर त्या बोलत होत्या.

नद्यांमधल्या जलप्रदुषणाला आळा घालण्यासह नदी पुनरुज्जीवनासंबंधी त्यांनी यावेळी भूमिका मांडली. त्या म्हणाल्या –

***होल्ड - पंकजा मुंडे***

**<><><><><>**

नागपुरातल्या मेयो तसंच मेडिकलमधल्या विविध विकास कामांचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज घेतला. इथल्या वैद्यकीय सेवासुविधा वाढविण्यासाठी सुमारे एक हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. ही कामे दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. किती कामं पूर्ण झाली याचा आढावा एप्रिल महिन्यात पुन्हा घेणार  असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

बुलडाणा जिल्ह्यातल्या नागरिकांना केसगळतीची समस्या उद्भवलेल्या गावांना आज केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट  दिली. केसगळतीच्या समस्येच्या कारणाचा शोध घेण्यासाठी  वैद्यकीय तज्ञ येणार असून इथल्या पाणी, साबण, वापरातील विविध वस्तुंचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले आहेत, असं जाधव यांनी यावेळी सांगितलं. यावेळी तहसीलदार, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

बचत गटांच्या उत्पादनांना कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याचं आश्वासन राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज नाशिक इथं दिलं. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत मिनी सरस आणि जिल्हास्तरीय स्वयंसहायता समुहांची उत्पादनं तसंच विक्री प्रदर्शनाचं उद्घाटन नाशिकमध्ये झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ड्रोन दिदी, लखपती दिदी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

**<><><><>**

शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांचे धडे मिळणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण घेण्याच्या वयात मुलांवर चांगल्या गोष्टींचा प्रभाव पडला तर तो

कायमस्वरुपी राहतो, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत वनामती इथं आयोजित कार्यक्रमात अभिनेते अनुपम खेर यांनी गडकरी यांची मुलाखत घेतली. त्यात त्यांनी रस्ते अपघातातील वाढत्या मृत्यूंविषयी चिंता व्यक्त केली. रस्ते अपघात रोखायचे असतील तर अचूक निर्माणकार्य आणि समाजजागृती या दोन्ही गोष्टी आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी महोत्सवाच्या पाचव्या दिवशी पारंपरिक जलयात्रेचे आज आयोजन करण्यात आले होते. जलयात्रेची सुरुवात तुळजापूरमधल्या पापनाश तीर्थ इथल्या इंद्रायणी देवीच्या मंदिरापासून होते.

<><><><><>

मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. तर कोकण आणि मराठवाड्यात तापमानात किंचित वाढ झाली आहे. मध्यमहाराष्ट्र आणि मराठवाड्यात  उद्यापर्यंत तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//